# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

**प्रधान कार्यालय** : "मुंबै बँक भवन", २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

---

दिनांक : ९ सप्टेंबर २०१४

**ग्राहकांच्या मुदत ठेवीचे Auto Renewal व संस्थांना पासबुक देण्याबाबतचे धोरण.**

बँकेच्या संचालक मंडळ सभा दि.२६/०८/२०१४ च्या ठरावा नुसार वार्षीक सर्वसाधारण सभेत सभासदांनी मागणी केल्यानुसार ग्राहकांना Auto Renewal सुविधा व पासबुक देण्याबाबतची मंजूरी देण्यात आली आहे. Auto Renewal धोरण खालील प्रमाणे आहे. त्यानुसार ग्राहकांनी मागणी केल्यास खालील निकषानुसार सदर सुविधा देण्यात यावी.

१) मुदत ठेव ठेवतांनाच वैयक्तिक खातेदारांकडून किती वेळा नुतनीकरण करावयाचे याबाबत सविस्तर पत्र घेणे व संस्थाकडून सुसंगत ठराव घेणेत यावा.

२) मुदत ठेवीचा कालावधी बदलावयाचा असल्यास एका नुतनीकरणाची मुदत संपण्यापूर्वी खातेदाराकडून लेखीस्वरुपात पत्र घेण्यात यावे.

३) मुदत ठेव, मुदतीपूर्व बंद करताना बँकेच्या प्रचलित पध्दती प्रमाणेच दंड आकारण्यात यावा.

४) "Auto Renewal" ठेव खात्यांना अधिकर्ष सुविधा मिळेल तथापी अधिकर्ष कर्ज मंजूरीनंतर "Auto Renewal" सेवा बंद करण्यात येईल.

५) "Auto Renewal" संगणक प्रणाली मार्फत मुदत संपलेल्या तारखेस करण्यात येईल.

६) प्रत्येक "Auto Renewal" साठी वेगळी मुदत ठेव पावती ग्राहकांच्या मागणीनुसार देण्यात येईल.

त्यांचप्रमाणे काही व्यक्तीगत / संस्था ग्राहक यांनी पासबूक ची मागणी केल्यास खात्यावर दरमहा २० पेक्षा कमी व्यवहाराच्या नोंदी असतील अशा खातेदारांना त्यांच्या मागणी नुसार पासबूक किंवा स्टेटमेंट देता येईल.

आपल्या बँकेमार्फत E-mail सेवा उपलब्ध करुन दिली जाते. यासाठी Paper less Banking नुसार ग्राहकांनी अधिकृतपणे सुसंगत पत्र / ठरावानुसार E-mail ID बँकेस दिल्यास पासबुक / स्टेटमेंट ऐवजी E-mail द्वारे सुध्दा खाते उतारा दिला जाईल याबाबत सुध्दा ग्राहकांना अवगत करावे.

शाखेच्या नोटीस बोर्डवर वरील सेवेअंतर्गत देण्यात येणाऱ्या सुविधेविषयी प्रसिध्दी देण्यात यावी. जेणेकरुन ग्राहकांना योजनेविषयी व्यवस्थित माहिती होईल व नंतर गैरसमजातून तक्रार करण्यास वाव राहणार नाही.